8805180508 Heyu@763

CR02600014

दैनिक रजि. नं. /२०२६

दाखल ता. ०५/०५/२०२६

क्रिमी. किरकोळ अर्ज नं 59 /२०२६

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल

यांचे कोर्टात......

मंगल रघुनाथ माने
व.व. ६०, धंदा — गृहिणी,
रा. गावडे गल्ली, कुमठे,
ता. तासगांव, जि. सांगली } अर्जदार

विरूध्द

महाराष्ट्र सरकार तर्फे
मुरगुड पोलिस ठाणे } वि.प

Order
A.P.P. and I.O. to say

J.M.F.C.
25.05.2026

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे जप्त मुद्देमाल मिळणेसाठी अर्ज

मुरगुड पोलिस स्टेशन गुन्हा रजि. नं. ९१/२०२५

गुन्हा — भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.), २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.05.25 17:49:56 +0530

यातील अर्जदारांची मे. कोर्टास विनंती कि,

यातील अर्जदार हे याकामी मुळ फिर्यादी आहेत. याकामी अर्जदार यांचे वापरातील एकपदरी साखळीची सोन्याची मोहनमाळ पावणे तीन तोळा वजनाची जु.वा. खरेदी केलेली होती. सदर सोन्याचे दागिने हे मुरगुड पोलिसांनी वर नमुद गुन्हयाचे कामी जप्त केलेले आहे. सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्या वापरातील असून जप्त मुद्देमाल मुरगुड पोलिस स्टेशनच्या ताब्यात जप्त अवस्थेत आहे. सदरचा जप्त मुद्देमाल हा आरोपी यांचेकडून जप्त केलेला आहे. सदर जप्त मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे —

| अ.क्र. | तपशिल | किंमत |
|---|---|---|
| १ | एकपदरी साखळीची सोन्याची मोहनमाळ पावणे तीन तोळा वजनाची जु.वा. | रू. १,४०,०००/— |
| | एकूण | रू. १,४०,०००/— |

वर वर्णन केलेला जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांच्या मालकीचे असून अर्जदार यांचे दैनंदिन वापरातील असून तो अर्जदार यांना बॉण्डवर परत मिळावा ही नम्र विंनती यांसी कारणे खालीलप्रमाणे—

१) सदर जप्त मुद्देमाल हा सदर पोलिस ठाणेत जप्त अवस्थेत पडून राहिलेस नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होण्याची शक्यता

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

नाकारता येणार नाही. त्यामुळे अर्जदार यांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

२) सदर जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना मे. कोर्टानी बॉण्डवर ताब्येत दिलेस त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल अथवा फेरफार करणार नाही अथवा सदरचा जप्त मुद्देमाल विक्री अगर तबदिल करणार नाही.

३) सदरहू जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना मे. कोर्टानी बॉण्डवर ताब्यात दिलेस मे. कोर्ट आदेश करतील त्यावेळी अर्जदार हे मे. कोर्टात हजर करणेस तयार आहेत.

४) सदर जप्त मुद्देमाल हा सदर पोलिस ठाणेत जप्त अवस्थेत पडून राहिलेस अर्जदार यांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

६) सदरहु जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना मे. कोर्टानी बॉण्डवर ताब्येत दिलेस अर्जदार हे मे. कोर्टाच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करणेस तयार आहे.

७) सदरहू जप्त मुद्देमालच्या मालकीशी इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नव्हता व नाही.

<u>८) सबब, अर्जदार यांची विनंती कि,</u>

अ) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब) वर नमुद केले वर्णनाचा सदर जप्त मुद्देमाल एकपदरी साखळीची सोन्याची मोहनमाळ पावणे तीन तोळा वजनाची

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

जु.वा. हे अर्जदार यांना बॉण्डवर ताब्यात देणेविषयी योग्य ते आदेश व्हावेत.

क) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

ड) न्यायाचे अनुषंगिक दादी अर्जदार यांचे वतीने व्हावेत.

येणेप्रमाणे अर्ज असे......

कागल मे. जा. व्हावे

दि. ०५/०५/२०२६

मंगल रघुनाथ माने

अर्जदार

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार मंगल रघुनाथ माने व.व. ६०, धंदा — गृहिणी, रा. गावडे गल्ली, कुमठे, ता. तासगांव, जि. सांगली शपथेवर कथन करते कि, वर नमुद केलेल्या अर्जातील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरहू जप्त मुद्देमाल या माझे मालकीचे आहेत. म्हणून केले शपथेवर ॲफिडेव्हीट आज मुा कोल्हापूर

दि. ०५/०५/२०२६

मंगल रघुनाथ माने

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो ॲफिडेव्हीट करणार

ॲड. व्ही. के. नलवडे

Assistant Superintendent
Judicial Magistrate Court
Court No 1, Kolhapur

# प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार मंगल रघुनाथ माने व.व. ६०, धंदा — गृहिणी, रा. गावडे गल्ली, कुमठे, ता. तासगांव, जि. सांगली सत्य प्रतिज्ञा करते कि, वर अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा

कोल्हापूर

मंगल रघुनाथ माने

दि. ०५/०५/२०२६ प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Shri Mangal Raghunath Mane
Age 60 of Kumathe, Tal Tasgaon Dist Sangli who is
identified by Shri A.V. V.K. Nalawade
............whom I know personally
Dated :- 5/5/26

Assistant Superintendent